# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ अन्वये आदेश.

५८९

जा.क्र सनिअ/वि.१/का.क.७७-अ/आदेश/सोमेश्वर.ग्रृ./सन१६
सहायक निबंधक,सहकारी संस्था,अलिबाग
जि.रायगड,यांचे कार्यालय, दिनांक:- ०४/१०/१६

वाचले :-

1) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ मधील तरतूद.
2) मा.जिल्हा उप निबंधक,सहकारी संस्था,रायगड-अलिबाग याचे कडील दिनांक ३०/०७/२०१६, ५/८/२०१६ व दि.०८/०८/२०१६ ची पत्रे.
3) या कार्यालयाकडील जा.क्र. सनिअ/वि.१/क.७७/का.दा.नोटीस/सन १६ दिनांक ०६/०९/२०१६

ज्याअर्थी, सोमेश्वर वैभव सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित अलिबाग, जि.रायगड नोंदणी क्रमांक आरजीडी/अेबीजी/एचएसजी/(टीसी)/१८०६/२००६ दिनांक २१/०३/२००६ (यानतर संस्था असा उल्लेख करण्यात येईल) या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यानतर अधिनियम असा उल्लेख करणेत येईल) या अधिनियमानुसार करण्यांत आलेली आहे. आणि,

ज्याअर्थी, वाचले क्रमांक २ अन्वये शासकिय लेखापरिक्षकानी संस्थेचे सन २०१३-१४ चा केलेला फेर लेखापरिक्षण अहवाल व सदर अहवालावर केलेला प्रशासकिय विशेष अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. आणि,

ज्याअर्थी, सदरचे प्रशासकिय विशेष अहवालात फेरलेखापरिक्षण अहवालाचे अवलोकन करता संस्थेने केलेल्या आर्थिक खर्चात अनियमितता आढळून येते. तसेच या कार्यालयांत ठेवण्यात आलेल्या सुनावणी दरम्यान अर्जदार श्री.वासुदेव नारायण कनोजे व प्रभाकर अनंत राऊत यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केले व त्यांनी त्यात नमूद केले की, "संस्था चालकानी मनमानीपणाने रक्कमांचा वापर केला आहे. तसेच त्यांनी लेखापरिक्षणावेळी आवश्यक ते उर्वरित दप्तर उपलब्ध करुन दिलेले नाही. व अन्य म्हणणे विचारात घेतले."

ज्याअर्थी, परस्पर विवाद न्यायालय व पोलिस ठाणे येथे प्रलंबित आहेत. त्याबाबत संबंधितांचे आरोप प्रत्यारोप होत आहेत हे भूषणावह नाही. आणि,

ज्याअर्थी, वाचले क्रमांक ३ अन्वये सुनावणीत प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणेबाबत विचारणा करता अध्यक्ष, सचिवांनी प्राधिकृत अधिकारी नेमणूकीस संमती दिलेली आहे. आणि,

ज्याअर्थी, सदनिका धारकांना सदनिका विकताना अकारण अध्यक्षाचे भूमिकेमुळे त्रास झाला. त्याच्या तक्रारी विविध स्तरावर दाखल झालेल्या आहेत. आणि,

ज्याअर्थी, सदर वस्तुस्थिती लक्षांत घेता संस्थेचे संचालक मंडळ आपले कर्तव्यात कसुर करीत आहे. व संस्थेचे पोटनियमानुसार व शासन निर्णयानुसार वेळोवेळी दिलेले सुचनांचे पालन करीत नाहीत. त्यामुळे संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाली आहे. त्यामुळे विदयमान संचालक मंडळ बरखास्त करुन प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करणेबाबत खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ नुसार प्राप्त झालेल्या अधिकार परत्वे मी, विठ्ठल सुर्यवंशी,सहायक निबंधक, सहकारी संस्था,अलिबाग सोमेश्वर वैभव सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. ब्राम्हणआळी, ता. अलिबाग या संस्थेवर श्री. एम.जे. नागांवकर लेखापरिक्षक,सहकारी संस्था, अलिबाग यांची प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करीत आहे.

हा आदेश मी आज दि. ०४/१०/२०१६ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिला असे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक- ०४/१०/२०१६

(विठ्ठल सुर्यवंशी)
सहायक निबंधक,
सहकारी संस्था,अलिबाग

प्रत :-

१. चेअरमन/सचिव,
सोमेश्वर वैभव सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.ब्राम्हणआळी,ता. अलिबाग
२/- यांना सूचित करण्यांत येते की आपण आपल्या संस्थेचे दप्तर प्राधिकृत अधिकारी यांना तात्काळ देवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयांस सादर करावा.

२. श्री. एम. जे. नागांवकर, प्राधिकृत अधिकारी, सोमेश्वर वैभव सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.ब्राम्हणआळी,ता. अलिबाग
२/- त्यांनी आपल्या संस्थेचे दप्तर ताब्यात घेवून कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयांस सादर करावा.

३) श्री.वासुदेव नारायण कनोजे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर.

१) मा.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,रायगड-अलिबाग.
२) मा.जिल्हा विशेष लेखापरिक्षक (वर्ग-१),सहकारी संस्था,रायगड-अलिबाग.

सहायक निबंधक,
सहकारी संस्था,अलिबाग.

6/10/16.

आवक
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था रायगड अलिबाग

दिनांक 06/10/2016
जिल्हा विशेष लेखापरिक्षक (वर्ग-१)
सहकारी संस्था रायगड-अलिबाग